महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
Email ID : - deskhkp.gad-mh@mah. gov.in

क्र.:- वाहन १६२५/ प्र.क्र.५७/गृहव्य दिनांक :-२९ सप्टेंबर, २०२६

प्रति,

आयुक्त,
इलेक्ट्रोनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कुत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषयः- सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) यांच्या अधिनस्त वाहन क्रमांक क्र. एमएच-०१-एएन-०६४५ (टोयोटा इनोव्हा) या वाहनाची विक्री/लिलाव करण्याबाबत...

महोदय,

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) यांच्या अधिनस्त वाहन क्र. क्र. एमएच-०१-एएन-०६४५ (टोयोटा इनोव्हा) निर्लेखित करण्यात आलेले असून, वित्त विभाग, शासन निर्णय दि.१८/०६/१९९१ अन्वये नमूद मार्गदर्शक सूचनांनुसार सदर वाहनाची विल्हेवाट/लिलाव करावयाचा आहे. तद्नुषंगाने, सदर वाहनाच्या विक्रीसाठी शासनाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत दि.२८.०९.२०२६ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. तथापि, सदर निविदा सूचनेमध्ये टंकलेखनाची चूक झालेली असल्याने, सदर दि.२८.०९.२०२६ रोजी प्रसिद्ध केलेली निविदा सूचना संकेतस्थळावरुन काढून टाकण्यात यावी व सोबत जोडलेली निविदा सूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

(सो. ल. लवांडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे.
प्रत:-निवडनस्ती/गृहव्य

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२.

Email ID :- deskhkp.gad-mh@mah. gov.in

क्र.:- वाहन-१६२६/ प्र.क्र.७५/गृहव्य दिनांक :- २९ सप्टेंबर, २०२६

निविदा सूचना

सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) या विभागाच्या अधिनस्त टोयोटा इनोव्हा कारची विक्री/लिलाव करण्यासाठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२. संबंधीत वाहनाचा तपशील व निविदेच्या अटी शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

| वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहनाचे मॉडेल वर्ष | इंधनाचा प्रकार | वाहनाची स्थिती | वाहनाची धावसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| एमएच-०१-एएन-०६४५ | Toyota Innova 2.5 V (E4) | २०१४ | डिझेल | चालू स्थितीत | किमी. |

३. त्याकरीता निविदा सूचनेसोबत जोडलेल्या निविदा प्रपत्रामधील विवरणपत्रात दर नमूद करुन निविदा मोहरबंद लिफाफ्यात कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग (गृहव्य/२४), दालन क्र. ६१२, ६ वा मजला, विस्तार इमारत, मुंबई यांच्याकडे दि.३०.०९.२०२६ ते दि.०८.१०.२०२६ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत जमा करावेत. त्यानंतर आलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत.

४. प्राप्त निविदा सह सचिव (गृहव्य) यांनी दिलेल्या तारखेस व वेळेला सह सचिव (गृहव्य) यांच्या दालनात उघडण्यात येतील. संपर्कासाठी निविदाकारांना संस्थेचा पत्ता/भ्रमणध्वनी क्र./ई-मेल ॲडरेस मोहरबंद लिफाफ्यावर नमूद करणे बंधनकारक आहे.

५. उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. ०१.१२.२०१६ अन्वये निविदाकारास निविदेत भाग घेण्याकरीता रुपये २०००/- इतके निविदा शुल्क (ना परतावा) आहरण व संवितरणअधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, तिसरा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२ यांच्याकडे जमा करणे बंधनकारक राहील. तसेच, रु. १०,०००/- इतकी बयाणा रक्कम (परतावा) कक्ष अधिकारी (गृहव्य), सामान्य प्रशासन विभाग यांच्या नावाने काढलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्षाच्या स्वरुपात निविदा लिफाफ्यामध्ये जमा करणे बंधनकारक आहे.

६. निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरल्याची पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नसल्यास निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

७. यशस्वी निविदाकारानेने निविदा मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव वाहन घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली बयाणा रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

८. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निविदाकारांची बयाणा रक्कम परत करण्यात येईल. तसेच, बयाणा रक्कमेवर (EMD) कोणतेही व्याज देय असणार नाही.

९. निविदेसोबत निविदाकाराने पॅनकार्ड/ आधार कार्ड इ. ओळखीचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.

१०. यशस्वी निविदाकारास वाहन आहे त्या स्थितीत व आहे त्या ठिकाणाहुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही. तसेच निविदा मंजूरी नंतर सदर वाहनाची जबाबदारी यशस्वी निविदाकाराची असेल.

११. सदर वाहन ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क/कराचा भरणा, अनुषंगीक खर्चाची संपूर्ण जबाबदारी यशस्वी निविदाकाराची राहील.

१२. सदर निविदा प्रक्रिया कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारण्याचे संपुर्ण अधिकार शासनाने राखुन ठेवलेले आहेत.

१३. यशस्वी निविदाकाराने वाहन ताब्यात घेताना शासनाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याबाबत मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई द्यावी लागेल.

१४. निविदेच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमी पत्र निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या निविदाकाराने स्वाक्षरी व शिक्क्यासह निविदेसोबत सादर करावे.

१५. निविदाकारास वाहनाची पाहणी करावयाची असल्यास कार्यालयीन वेळेत उपरोक्त पत्त्यावर करता येईल.

(सो. ल. लवांडे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

# निविदा प्रपत्र

क्र.:- वाहन १६२६/ प्र.क्र.७५/गृहव्य

दिनांक :-२८ सप्टेंबर, २०२६

## वाहनाचा तपशिल:-

| वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वाहनाचे मॉडेल वर्ष | इंधनाचा प्रकार | वाहनाची स्थिती | वाहनाची धावसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| एमएच-०१-एएन-०६४५ | Toyota Innova 2.5 V (E4) | २०१४ | डिझेल | चालू स्थितीत | किमी. |

## निविदा दर पत्रक

| अ.क्र. | वाहन | वित्त विभाग, शासन परिपत्रक दि. १८.०६.१९९१ अन्वये काढलेली वाहनाची हातची किंमत | निविदाकाराने नमूद करावयाची किंमत |
|---|---|---|---|
| १ | एमएच-०१-एएन-०६४५ Toyota Innova 2.5 V (E4) | ३,५५,३२०/- | |

निविदाकाराचे नाव :-

पत्ता:-

स्वाक्षरी:-

दुरध्वनी क्र:-